Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५
शिवाजी विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमानुसार

बी. ए. १ : संस्कृत (DSC)

Sem- 1 (सत्र -१)

# संस्कृत महाकाव्यांचा परिचय

Course Number: 01

Course Code: BAU0325DSL205A01

**लेखक आणि संपादक**

प्रा. (डॉ.) श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे
संस्कृत विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

डॉ. कावेरी नारायणराव जाधव
सहाय्यक प्राध्यापक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

# घटक -२

# महाकवि कालिदासविरचित रघुवंशम्

## प्रथमः सर्गः- (श्लोक १-२५)

### २.१ प्रस्तावना

रघुवंशम् महाकाव्य १९ सर्गांमध्ये विभागलेले आहे. यात १५६९ श्लोक आहेत. हे महाकाव्य सूर्यवंशातील ३१ राजांच्या शौर्याचे आणि जीवनाचे वर्णन करते. अत्यंत भव्य आणि दयाळू राजा मनूपासून अत्यंत विलासी राजा अग्निवर्णापर्यंतची कथा रघुवंशम् महाकाव्यामध्ये संकलित केली आहे. रघुवंश महाकाव्याचा मूळ स्त्रोत रामायण आहे.परंतु रघुवंशम् महाकाव्याची कथा पद्मपुराणाच्या जवळ आहे. रघुवंशम् हे वीर महाकाव्य आहे. कवीने या महाकाव्यात रघुवंशाच्या उदय आणि अस्ताचे सुंदर वर्णन केले आहे.

रघुवंशम् महाकाव्यात एकूण २८+०३=३१ राजांचे वर्णन आहे.

(१) राजा दिलीप (२) रघु (३) अज (४) दशरथ (५) राम (६) कुश (७) अतिथी (८) निषध (९) नल (१०) नभ (११) पुंडरिक (१२) क्षेमधन्वा (१३) देवानीक (१४) अहीनग (१५) पारियात्र (१६) शील (१७) उन्नाभ (१८) वज्रनाभ (१९) शंखण (२०) व्युषिताश्व (२१) विश्वसह (२२) हिरण्यनाभ (२३) कौशल्य (१४) ब्रह्मनिष्ठ (२५) पुत्रपुष्य (२६) ध्रुवसंधी (२७) सुदर्शन (२८) अग्निवर्ण. येथे रामासह लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांच्यासह एकूण ३१ राजांचे वर्णन केले आहे. रघुवंश महाकाव्य एकोणीस सर्गांमध्ये विभागलेले आहे. त्यात महाकाव्याची सर्व वैशिष्ट्ये आहेत.